क्र.CIC/अ.क्र.६५९२/२०२६

श्री. सुभाष लक्ष्मण मसराम,
मोठ्या हनुमान मंदीराशेजारी,
पोलीसचौकीजवळ, पांढराबोडी, नागपूर-440033.

विरुद्ध

जनमाहिती अधिकारी
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, महाराष्ट्र शासन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई-400032.

प्रथम अपिलीय अधिकारी
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, महाराष्ट्र शासन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई-400032.

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०५.०८.२०२६

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

मूळ अर्जाचा दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक	प्रथम अपीलाचा दिनांक	प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक
१०.०१.२०२२	१४.०२.२०२२	२१.०२.२०२२	२१.०३.२०२२

अपिलार्थीनी तत्कालीन सहसंचालक श्री.अ.म.जाधव यांच्यावरील विभागीय चौकशी/ निलंबनाबाबत दिनांक ०४/०१/२०२२ ते आजपर्यंत झालेली कारवाई, विभागीय चौकशी यासंदर्भात प्राप्त झालेले अहवाल तसेच सद्य:स्थिती याबाबत माहिती मागितली असून तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी दिनांक १४.०२.२०२२ रोजीच उत्तर दिले असून मागितलेली माहिती ही **कलम ८ (१) (त्र)** नुसार तसेच **कलम ८ (१) (ज)** नुसार देणे शक्य नसल्याचे नमूद केले आहे. तसेच सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक १७.१०.२०१४ रोजीचे परिपत्रक, माननीय सर्वोच्च न्यायालय यांच्या गिरीश रामचंद्र देशपांडे विरुद्ध केंद्रीय माहिती आयोग या प्रकरणात दिलेले स्वच्छ दिशा निर्देश लक्षात घेता उपरोक्त माहिती उघड करणे बंधनकारक नसल्याचे नमूद केलेले आहे. यामध्ये

अपिलार्थींच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ३१.०३.२०२२ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसचिव श्री.भोसले यांच्याकडे सुनावणी झाली असून अपिलार्थी सुनावणीस उपस्थित नसल्याचे आढळून येते.

आज झालेल्या सुनावणीस अपिलार्थी हजर नाहीत. तथापि, श्री.जाधव यांचेवरील विभागीय चौकशी अद्यापही सुरू असून लाच लुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाही संदर्भात प्रकरण देखील प्रलंबित आहे. ही बाब लक्षात घेता या प्रकरणी विभागीय चौकशी पूर्ण झाल्यानंतर व अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर, त्यावर निर्णय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अपिलार्थीना उपरोक्त माहिती प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

आदेश

१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

२. अपिल क्र.६५९२/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-

मुंबई **(राहुल भा.पांडे)**

दिनांक : ०५.०८.२०२६ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**